नियमित फौजदारी खटला क्र.२४/२०२१
निशाणी क्र.३८

सरकारतर्फे साक्षीदार क्र.३ चा सरतपासः-
मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,
माझे नावः - चंदा आनंद सुखदान,
वय - ३० वर्षे, धंदा - शेती,
राहणार - लाखेफळ, ता. नेवासा, जि.अ.नगर.
अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एम.के.सोनवणे यांचे मार्फत सुरुः-

मी आरोपी क्र. १ व २ यांना ओळखते. कारण ते माझ्या शेजारी राहण्यास आहे. सदर घटना दिनांक ११/११/२०२० रोजी दुपारी ४:०० वाजता माझ्या घरी लाखेफळ येथे घडली होती. त्यावेळी आरोपी क्र. १ हिची सासु सखुबाई ही माझ्या घरी येऊन बसली होती. त्यावेळी तिथे आरोपी क्र. १ आली व मला म्हणाली की, 'माझ्या सासुसोबत काय बोल आहे' असे म्हणून मला घाणघाण शिवीगाळ केली व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यावेळी मी आरोपी क्र. १ हिस म्हणाले की, 'तु मला शिवीगाळ का करते? त्यानंतर तिथे आरोपी क्र. २ काठी घेऊन आला व काठी मला ओठावर मारली'. त्यामुळे माझा ओठ फुटला व रक्त आले. त्यानंतर मी पोलिस स्टेशनला गेले. तिथे मला सरकारी दवाखान्यात पाठवले. त्यानंतर १२/११/२०२० रोजी फिर्याद दाखल केली. मी रात्रभर दवाखान्यात असल्याने घटनेच्या दुस-या दिवशी फिर्याद दिली. आता मला यादी दाखविण्यात आली. ती तिच आहे. त्यावर माझी व पोलिसांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास नि. ३९ देण्यात येते. आता मला मी दाखल केलेली फिर्याद दाखविण्यात आली. ती तिच आहे. त्यावर माझी असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास नि. ४० देण्यात येते. आरोपींनी ज्या काठीने मारहाण केली ती मला दाखविल्यास मी ओळखु शकते. आता मला जप्त काठी दाखविण्यात आली. ती तिच आहे. त्यास एम.ओ.ए. देण्यात येते. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर नाही.

सरतपास पुर्ण.

आरोपी व विधिज्ञ यांना वारंवार पुकारले असता गैरहजर. गैरहजेरी माफीचा अथवा तहकुबीचा अर्ज अभिलेखावर दाखल नाही. आरोपीतर्फे निशाणी ३७ वरील आदेशाप्रमाणे पुर्तता केलेली नाही. सबब, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३०९ (२)(क) उलटतपास बंद.

श्रवणोत्तर स्वीकृती,
सही/-
(श्रीमती.ए.एन.सरक)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३,
नेवासा.

दिनांक- ०४/१२/२०२५.